महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

✻ उत्सुकता ✻




RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १३ वे ■ अंक क्र. – ८९ ■ शुक्रवार, दि. १६ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

# कामगार तलाठी बाळासाहेब ढोरमारे यांना कोळगाव थडी येथे वाळू तस्करांनी केली होती गंभीर मारहाण

**दै.आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:–

शिर्डी प्रांताधिकारी यांच्या आदेशानुसार कोळगाव थडी जुने गावठाण येथे अवैध वाळू साठ्याचा पंचनामा करण्यासाठी गेलेल्या कामगार तलाठ्यास तेथे असलेल्या वाळू तस्करांनी गंभीर मारहाण केल्याने महाराष्ट्रभर महसूल कर्मचाऱ्यांनी वाळू विरोधात असहकार आंदोलन हाती घेतले होते या घटनेचा धडा घेऊन वन विभागाने खबरदारी घेत पुरेशा वन पोलिसांच्या बंदोबस्तात कोळगाव थडी येथे छापा टाकायला जाणे गरजेचे असतांना गस्ती पथकांवरच वाळू तस्करांनी लोखंडी रॉड,काठ्या कोयता घेऊन प्राण घातक हल्ला चढवत शासकीय वाहनांची तोडफोड केली. कारवाई साठी आलेल्या पथकालाच जिवाच्या भितीने अंधारात लपावे लागले शेवटी ११२ ला फोन केल्यानंतर पोलीस पेट्रोलिंग वाहन आल्या नंतर तोडफोड झालेली गाडी घेवुन तालुका पोलिस स्टेशन गाठत वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब वाघुलकर यांच्या फिर्यादीवरून १२ जनावर विविध कलमान्वये ४५०/२०२६ नुसार ९ ऑक्टोबर रोजी गुन्हा नोंदवण्यात आल्या नंतर कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड सहायक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे यांच्या पथकाने ८ आरोपींना अटक करत न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठड़ी दिल्यानंतर त्यांना जामीन मंजूर झाला असुन फिर्यादी मध्ये नमुद ४ व अज्ञात ३५ ते ४० आरोपीना शोधण्याचे काम ए.पि.आय सुंदरडे हे करित आहे. वनविभागाच्या गस्ती पथकांवरच जिव वाचवण्याची वेळ या आशयाचे वृत्त विविध न्यूज वाहिन्या व वृत्तपत्रांतून नागरिकांना अनभुवले असतांना सुरेगाव कामगार तलाठी बाळासाहेब सदाशिव ढोरमारे, सागर सावरकर व कोतवाल संदीप शहाणे हे कोळगाव थडी जुने गावठाण येथे वाळूचे पंचनामे करीत असताना त्या ठिकाणी त्यांना दहा ते पंधरा ट्रॅक्टर अवैध वाळू उपसा करताना आढळून आल्यानंतर याची कल्पना त्यांनी वरिष्ठांना देत पंचनामा चालू केला असताना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या तस्करांनी आपल्या साथीदारांना फोन करून बोलावून घेत जमावाला उद्देशून यांना येथेच मारून टाका म्हणजे इथे कोणताही सरकारी अधिकारी परत येणार नाही अशी चिथावणी दिली.आरोपिंनी लोखंडी टॉमी फिर्यादीच्या डोक्यात मारीत असताना हाताला गंभीर दुखापत होवुन ढोरमारे यांचा हात फॅक्चर झाला होता तर सागर सावरकर संदीप शहाणे हे दोघे जखमी झाले होते. कामगार तलाठी ढोरमारे यांच्या जबाबावरून २९ आरोपी विरोधात त्यावेळी तालुका पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या विरोधात महसूल व तलाठी संघटनेने काम बंद आंदोलन करत वाळू या विषयावर घोषित बंद पुकारला होता. वन विभागाच्या कर्मचार्यावर दोनदा व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यावर कोळगाव थडी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या तस्करांनी अलिकडच्या प्राण घातक हल्ला केल्याची हि तिसरी घटना आहे.

कोळगाव थडी वनविभागाच्या पथकावर झालेल्या हल्ल्यानंतर येथील अवैध वाळू उपसा व वाहतूक तूर्तास बंद असली तरी पाचशे मीटर अंतरावरील सुरेगाव येथे गोदावरी नदीपात्रातून फरांडी च्या साह्याने दिवस रात्र वाळू उपसा होवुन रात्रीच्या वेळेस डंपरच्या साह्याने राज्य मार्ग ७ वरुन शिर्डी च्या दिशेने होणारी वाळू वाहतूक पोलीस व महसूल प्रशासनाच्या दृष्टीस का येत नाही याकडे वरिष्ठ कार्यालयाने लक्ष देण्याची गरज आहे.







श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

## श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून

**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻

- ✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
- ✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
- ✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
- ✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
- ✻ मुला–मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
- ✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
- ✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

✻ प्राचार्य :– मोबा. 9922172799






# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक-एक-कण;सोबतच पाणी व निसर्ग वाचविण्याची गरज

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील उपासमारी संपुष्टात येईल.खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला खाद्य व कृषि संघटन ( एफएओ ) ची स्थापणा केली.कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश(एफएओ) ने १६ आक्टोंबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवससाजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस साजरा केल्या जातो.या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करणे. उपासमारी,कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करणे.उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आनणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणाये लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. अन्न हे पुर्ण ब्रम्ह म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव,जीवजंतू,वन्यप्राणी,जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते व निसर्गाचे संतुलन टिकवण्यासाठी वृक्षांची गरज असते. त्याचबरोबर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर व निसर्गावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे. कारण पाणी राहले तरच अन्नाचे उत्पादन होवु शकते.१६ आक्टोंबर संपूर्ण जग विश्व खाद्य दिवसम्हणुन साजरा करतात.कारण खाद्यांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोज-गार मिळवीण्यासाठी का धावपळ करतो?, मोल-मजुर, कामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो वितभर पोटाची खळगी भरणे कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे यालाही नाकारता येत नाही. करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती.कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता. त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले.अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो. तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या पोटाची खळगी भरते. म्हणुनच शेतकऱ्यांना अन्नदा-ता म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उप-ाशी मरण्याची पाळी येवु शकते.परंतु मान-वजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे सर्वप्रथम १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी शतशत प्रणाम करतो. कारण ऊन,पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो.भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच कृषिप्रधान देशपरंतु गेल्या ७९ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दुःखी असल्याचे दिसून येते.कारण आजच्या परिस्थितीत देशातील अनेक शेतकरी कोरड्या दुष्काळाशी सामना करीत आहेत.शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे. परंतु आर्थिकदृष्ट्या कंगाल व शुन्य आहे.कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करतांना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ,राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला,सोने-नाने,चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी भोपळा आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या ७९ वर्षांपासून आपण पहात आहोत.त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे.भारत स्वतंत्र झाल्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता भासू दिली नाही.परंतु चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते.म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य




प्राणी खायला सुरुवात केली. चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्राण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली. अशा कठीण परिस्थितीतुन जावुनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे.परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पुर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता व एकनिष्ठता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊनच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात.आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का?याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे. आज भारतात उलटी गंगा वाहतांना दीसते देशातील ७० टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे.परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे.याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते. त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते.आतातर वाढते प्रदुषण,ग्लोबल वॉर्मिंग व अलनिनोच्या प्रभावामुळे मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे. विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक,आजी-माजी आमदार-खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षात करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का?की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन,इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते.हे लोकशाहीच्या देशात चालय्य तरी काय?सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार,समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्र्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे.आंतराष्ट्रिय माहिती नुसार जगात उपाशपोटी झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे.संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर २००७ पासुन ४० देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता.सध्या गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अच-ानक इजरायल- हमास-हिज्बुल्ला-इराण-अमेरिका यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे.यामुळे युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे.याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे व पुढे आणखी भयावह परिस्थिती होऊ शकते. भारतीय खाद्य निगमने स्वत: कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचा अनाज म्हणजे १०.४० लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दु:खद व चिं-ताजनक बाब आहे.कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भुक मीटवु शकते.परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही. यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात.भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शिकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्र्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- १०२, बांगलादेश-८१, नेपाळ-६९, श्रीलंका -६० व्या स्थ-ानावर आहे.भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे. आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कण वाचवीण्याची गरज आहे.आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हण-तात दाने दाने पे लिखा है, खाने वाले का नाम या म्हणीची पुर्तत: होवु शकते.आज १४५ कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४५ कोटी जनतेला विनंती करतो की अन्नाचा एक-एक कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे.कारण देशातील वाढती लोकसंख्या,जगातील युद्धजन्य परिस्थिती, बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव पह-ाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे.कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे. त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रा-खला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे.तेव्हाच विश्र्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल.संपुर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते.म्हणजेच आज जगात खाद्यान्न पेक्षा, निसर्गापेक्षा व पाण्यापेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दील्याजात आहे.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो.याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे व निसर्ग वाचवण्यासाठी प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण,भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.जय हिंद.

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

# लासलगाव महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, १५ ऑक्टोबर: नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प-हार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्रा-




चार्य डॉ. सोमनाथ आरोटे, प्रा. किशोर गोसावी व प्रा. उज्वल शेलार इ. उप-स्थित होते. आपल्या मनोगतात उपप्रा-चार्य डॉ. सोमनाथ आरोटे आणि प्रा. किशोर गोसावी यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना नियमित वा-चनाची सवय लावण्याचे आवाहन केले. 'श्यामची आई' पुस्तकाचे वाटप आणि संस्कार परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी विशेष उपक्रम राबवत साने गुरुजी लिखित 'श्यामची आई' या प्रेरणादायी पुस्तकाचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. तसेच, महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे घेतल्या जाणाऱ्या 'साने गुरुजी कथामाला संस्कार परीक्षे'त ३२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. उज्वल शेलार यांनी विशेष परिश्रम घेतले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांनी आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे स्पष्ट करत विद्यार्थ्यांना वाचन-ातून समृद्ध होण्याचा मोलाचा संदेश दिला. या कार्यक्रमास रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिल गायकर, प्रा. देवेंद्र भांडे, प्रा. महेश होळकर, प्रा. जयश्री पाटील, प्रा. दत्तात्रय गायकवाड, प्रा. रामसिंग वळवी यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रामनाथ कदम यांनी तर प्रास्ताविक प्रा. उज्वल शेलार यांनी केले आणि आभार प्रा. जयश्री पाटील यांनी मानले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री. गो-विंदराव होळकर यांचे विशेष मार्गदर्शन या उपक्रमास लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो. विभाग आणि सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.



हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# दै.आवाज वृत्ताच्या दणक्यानंतर शिक्षण विभागाची सालभोये येथे तातडीने धाव

**दै.आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड –

सुरगाणा तालुक्यातील सालभोये येथील जि.प.शाळेत .शिक्षकांच्या अनियमितता असल्यामुळे विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा ग्रामस्थांनी दि १२/१०/२०२६ रोजी निवेदन पंचायत समिती सुरगाणा येथे दिले होते. त्याची दि. १४/१०/२०२६ रोजी दै.आवाज ने वृत्त प्रसिद्ध होताच शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित शाळेला दि. १४/१०/२०२६ रोजी भेट दिली. या भेटीदरम्यान अधिकारी गटशिक्षण अधिकारी मॅडम शाळेत दाखल होताच ग्रामस्थांनी शाळेत धाव घेत आपल्या तक्रारी मांडल्या. यावेळी गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांच्या पथकाने परिस्थितीची पाहणी केली. संबंधित प्रकरणातील बाबींचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून पुढील कार्यवाहीसाठी नोंद घेण्यात येणार असल्याचे विस्त–ार अधिकाऱ्यांनी सांगितल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. शिक्षक बदलण्याबाबत अधिकाऱ्यांचे आश्वासन ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शिक्षकाला तातडीने कामावरून हटवून दुसऱ्या शिक्षकाची नियुक्ती करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांसमोर सांगितले. मात्र, शिक्षक बदलण्याबाबतचा अधिकृत आदेश आणि नवीन शिक्षकाच्या नियुक्तीची खात्री संबंधित शिक्षण विभागाकडून होणे आवश्यक आहे.

४ ते ५ महिन्यांच्या पाठपुराव्याला यश? ग्रामस्थ आणि सर्वांगीण गाव विकास समिती गेल्या चार ते पाच महिन्यांपासून या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करत होती. अखेर शिक्षण विभागाच्या पथकाने शाळेला भेट दिल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. आता ग्रामस्थांची एकच मागणी – विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळेतील कारभार पारदर्शक व्हावा आणि मुलांचे शैक्षणिक नुकसान थांबावे! दि. १४/१०/२०२६ रोजी दै.आवाज च्या वृत्तानंतर शिक्षण विभागाची तातडीची कारवाई; ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे शाळेच्या कारभाराकडे प्रशासनाचे लक्ष. त्यावेळी गटशिक्षण अधिकारी व विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, पोलीस पाटील, सरपंच, गावकरी,उपस्थित होते तसेच दै आवाज ने वृत्त दिल्याबद्दल गावाकऱ्यांनी आभार मानले.



# मणक्याचे आरोग्य जपा, वेदनामुक्त जीवनाचा संकल्प करा!

## जागतिक स्पाइन दिनानिमित्त डॉ. शेखर चिरमाडे यांचे नागरिकांना आवाहन

**दै.आवाज वृत्तसेवा...**

**भाऊसाहेब हुजबंद, नाशिक :** मणका हा मानवी शरीराचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असून शरीराची हालचाल, संतुलन आणि दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्यात त्याची महत्त्वाची भूमिका असते. मात्र, बदलती जीवनशैली, दीर्घकाळ एकाच जागी बसून काम करणे, चुकीची बैठक, व्यायामाचा अभाव आणि वाढता मोबाईल व संगणकाचा वापर यामुळे मणक्याशी संबंधित समस्यांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे मणक्याच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे, असे मत अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथील ज्येष्ठ मेंदू व मणक्याचे शल्यविशारद डॉ. शेखर चिरमाडे यांनी जागतिक स्पाइन दिनानिमित्त व्यक्त केले. पाठदुखी, मानदुखी, कंबरेतून पायाकडे जाणारी वेदना, हातापायांना मुंग्या येणे किंवा अशक्तपणा जाणवणे ही मणक्याशी संबंधित समस्यांची लक्षणे असू शकतात. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. योग्य वेळी निदान आणि उप–चार केल्यास अनेक रुग्णांना वेदनांपासून आराम मिळू शकतो आणि दैनंदिन जीवन अधिक सुलभ होऊ शकते.



मणक्याचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नियमित व्यायाम, योग्य पद्धतीने बसणे व उभे राहणे, वजन नियंत्रणात ठेवणे, जड वस्तू उचल–ताना योग्य तंत्राचा वापर करणे आणि कामाच्या दरम्यान नियमित विश्रांती घेणे आवश्यक आहे. तसेच, सतत पाठदुखी होत असल्यास स्वतःहून औषधे घेण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये मणक्याशी संबंधित विविध समस्यांचे निदान आणि उपचारांसाठी तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध आहेत. मणक्याच्या आरोग्याबाबत जागरूक राहून वेदनामुक्त आणि निरोगी जीवन जगण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा, असे आवाहन डॉ. शेखर चिरमाडे यांनी केले.




# शिवसेना शिंदे गटाचे नेते डॉ.सुधीर जाधव व धनगर समाजाचे नेते दत्तात्रय वैद्य यांचा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला पंचायत समिती व कृषी उत्पन्न बाजार समिती येवलाचे माजी सभापती शिवसेना शिंदे गटाचे नेते सुधीर जाधव यांनी आज राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. मंत्री छगन भुजबळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने नाशिक येथील कार्यालयात डॉ.सुधीर जाधव यांनी कृषि, सहकार क्षेत्रासह पक्षातील नेत्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



डॉ.सुधीर जाधव यांच्या समवेत येवला खरेदी–विक्री संघाचे माजी चेअरमन तथा धनगर समाज उन्नती मंडळाचे तालुकाध्यक्ष दत्तात्रय वैद्य, खरेदी विक्री संघाचे विद्यमान संचालक संतोष वैद्य, आनंदा वैद्य, खरेदी–विक्री संघाचे माजी संचालक जगन बोराडे, महेंद्र वैद्य, अनकाई विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन गणपतराव देवकर, शरद सोनवणे, चेअरमन वाल्मिकराव जाधव माजी सरपंच नामदेवराव सोनवणे, राजूभाऊ नंदाळे,दिलीप गोरे, विशाल वनसे यांसह कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

याप्रसंगी आमदार पंकज भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष साहेबराव मढवई, ओबीसी सेल–चे समाधान जेजुरकर, येवला पंचायत समितीचे गटनेते डॉ.मोहन शेलार, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा.ज्ञानेश्वर दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे येवला शहर अध्यक्ष दत्ता निकम, येवला कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती देविदास निकम यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिओ स्टुडिओज आणि केदार शिंदे पुन्हा एकत्र; ‘आई भाड्याने हवी?’ च्या चित्रीकरणाला सुरुवात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तीन वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या ‘बाईपण भारी देवा’ या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीत यशाचा नवा मापदंड प्रस्थापित करत सर्व वयोगटांतील प्रेक्षकांची मने जिंकली. या चित्रपटाच्या अभूतपूर्व यशानंतर जिओ स्टुडिओज् आणि लोकप्रिय दिग्दर्शक केदार शिंदे पुन्हा एकदा एका नव्या मराठी चित्रपटा निमित्त एकत्र आले आहेत. ‘आई भाड्याने हवी?‘ असे या आगामी चित्रपटाचे नाव असून, चित्रपटाच्या चित्रीकरणाला आजपासून सुरुवात झाली आहे.

नवरात्रीच्या मंगलमय पर्वात स्त्रीशक्तीचा जागर होत असताना, मातृत्वाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ होणे विशेष औचित्यपूर्ण आहे.

या चित्रपटात सुकन्या कुलकर्णी, विशाखा सुभेदार, पायल जाधव आणि प्रार्थना बेहरे या अभिनेत्री महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. या कलाकारांच्या एकत्रित उपस्थितीमुळे चित्रपटाला अधिक रंगत येणार आहे.

केदार शिंदे दिग्दर्शित आणि ज्योती देशपांडे व सना शिंदे निर्मित ‘आई भाड्याने हवी?‘ हा विनोदी, भावनिक आणि नातेसंबंधांची गुंफण असलेला सामाजिक मनोरंजनपट असणार आहे. आपल्या संस्कृतीशी नातं जपणारी आणि सर्व पिढ्यांतील प्रेक्षकांना भावणारी कथा सादर करण्याचा या चित्रपटाचा प्रयत्न आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि सनफ्लॉवर स्टुडिओजच्या सहयोगाने साकारला जाणारा हा चित्रपट, दैनंदिन आयुष्यातील नात्यांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करणार आहे.

*‘बाईपण भारी देवा’*च्या यशस्वी सहकार्यानंतर जिओ स्टुडिओज आणि केदार शिंदे यांची ही नवी कलाकृती मराठी




चित्रपटसृष्टीत आणखी एक नवा मापदंड निर्माण करण्यासाठी सज्ज होत आहे. आशयपूर्ण कथानक, आपल्या संस्कृतीशी नातं जोडणाऱ्या आणि व्यापक प्रेक्षकवर्गाला भावणाऱ्या कथा सादर करण्याच्या जिओ स्टुडिओजच्या प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

‘आई भाड्याने हवी?’ हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

# फुटपाथवर फेकलेला पोटचा गोळा ते विद्यापीठ एक धगधगता अंगार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

आज १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन . डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती शिवाय कविवर्य नारायण सुर्वे यांची जयंती त्या निमित्त समाजाने ज्याला खोडकर, फुटकळ, वेंधळा, बिनकामाचा ठरवलं ,स्वतःच्या आईनेच ज्याला जगण्यासाठी नाकारलं फुटपाथवरून विद्यापीठापर्यंत लिहिलेल्या कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनात आज आपण जरा डोकावून बघूया.

आजच्या दिवशी, म्हणजे १५ ऑक्टोबर १९२६ एक काळीज हेलावून टाकणारी घटना घडली. एक बाळ जन्माला आले, ज्याच्या नशिबात ना घर होते, ना दार. ना सगे सोयरे ना गणगोत. जन्मदात्या आईनेच पोटच्या गोळ्याला रस्त्यावर फेकून दिले. सुगरणीला खोपा लाभावा तसे फक्त अनाथालय, फुटपाथ, वांद्रेच्या वाड्या ,गटारी हेच त्याचे पाळणाघर. त्या जन्माने दुर्दैवी पण कर्माने सटवायीच्या लेखणीवर टिच्चून काळाच्या पडद्यावर नाव कोरणारे नारायण गंगाराम सुर्वे.

गंगाराम सुर्वे नावाच्या गिरणी कामगाराने त्याला उचलले, म्हणून तो नारायण गंगाराम सुर्वे झाला. नाहीतर त्याचा कुठलाच धर्म नव्हता, कुठलीच जात नव्हती. फुटपाथ हेच त्याचे घर होते आणि मुंबईची धूळ हीच त्याची शाल होती. आज जेव्हा आपण 'माझे विद्यापीठ' वाचतो, तेव्हा ते विद्यापीठ कुठले?

नाशिकच्या, मुंबई किंवा पुण्याच्या इमारतीतले नाही, तर दादरच्या पुलाखालच्या मुलांचे, हॉटेलात कपबशा घासणाऱ्या पोरांचे विद्यापीठ.

हॉटेलात वेटर, गिरणीत झाडूवाला, शाळेत शिपाई, पेपर विकणारा, घोड्यांचे शेण काढणारा नालबंदाचा मदतनीस – सातवी पास झालेला हा पोरगा शिकला कुठे? रस्त्यावरच्या खांबावरच्या जाहिराती वाचून, भिंतीवरच्या बाराखडी वाचून. स्वतःच्या हिमतीवर तो लिहिता-वाचता झाला. १९६२ ला त्याचा पहिला स्फोट झाला – ऐसा गा मी ब्रह्ममराठी कवितेच्या गाभाऱ्यात तो फुटपाथवरचा माणूस घुसला.

**नारायण सुर्वे आज असते तर काय म्हणाले असते?**

आज औद्योगिक क्षेत्र बघा. सुर्वेंच्या काळात गिरण्या होत्या, संप होते, लाल बावटा होता. कामगार म्हणायचा – माझ्या हातावर पोट आहे, पण हातात हत्यारही आहे!

आज काय परिस्थिती आहे? कामगारांची संख्या फक्त घटली नाही,तर माणुसकी घटली: पूर्वी ५००० कामगार असलेल्या कंपनीत आता ५०० कामगार आणि ४५०० कंत्राटी. कंपनीच्या गेटवर लिहिलेले असते – We are family. आत गेल्यावर कळते, कुटुंबातही आता ठेकेदारी आली आहे. कायम कामगार संपला, कंत्राटी माणूस आला. त्याला झक्र नाही, संपावर जाण्याचा अधिकार नाही. तो फक्त बारकोड आहे.

सुर्वे म्हणाले होते – दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दुष्काळात गेले... आजचा कंत्राटी कामगार म्हणतोय – दोन दिवस कंपनीच्या गेटवर उभे राहण्यात गेले, दोन दिवस कंत्राटदाराच्या दारात गेले.

आंदोलने दाबली कशी जातात? पूर्वी लाठीचार्ज व्हायचा, आता लाईफचार्ज होतो. संप केला की थेट WhatsApp da 'ogoO - You are terminated due to performance issue. कामगार संघटनेचा नेता बोलला की दुसऱ्या दिवशी त्याची बदली गुजरातला, तामिळनाडूला. भीतीचे वातावरण एवढे की संपाची नोटीसही आता कोणी देत नाही.

सुर्वेंच्या काळात याकूब नालबंदवाला होता, आफ्रिकन चाचा होता. जो म्हणायचा – हमारा खून जिंदाबाद! आजचा आफ्रिकन चाचा उउढत कॅमेऱ्यात कैद झाला आहे. उद्योजक संस्थानिक झाले:

पूर्वी मालक कारखानदार होता, आता तो संस्थानिक आहे. कामगार संघटना त्याच्या दरबारातली मांडलिक झाली आहे. वार्षिक अधिवेशनात मालकाच्या फोटोला हार घालणारी संघटना, म्हणजे संघटना राहिली का? मालक म्हणतो – कामगारांनी समजून घेतले पाहिजे. पण मालकाने कधी कामगाराची झोपडी समजून घेतली का?

यावर मिर्झा गालिबचा शेर आठवतो – न था कुछ तो खुदा था, कुछ न होता तो खुदा होता, डुबोया मुझको होने ने, न होता मैं तो क्या होता!

आजचा कामगार स्वतःच्या असण्यानेच बुडाला आहे. सुर्वेंचे अबाधित स्थान आणि झालेली अवहेलना मराठी साहित्य विश्वात सुर्वे म्हणजे बंड. पण आपण त्यांना काय दिले? दादर पुलाखालची मुले ही कादंबरी वाचून आपण हळहळलो, पण पुलाखालची मुले आजही तिथेच आहेत. फक्त आता त्यांच्या हातात भीकेचा कटोरा नाही, मोबाईल आहे. सुर्वेंना आपण 'कामगार कवी' म्हणून एका कप्प्यात बंद केले. ते फक्त कामगारांचे नव्हते, ते माणसाचे कवी होते. त्यांनी लिहिले –

सनद – मी एक कामगार, माझ्या हातात आहे सनद, या पृथ्वीवर माझ्या घामाचा हक्क आहे!

ही सनद आज कोण मानतो? बिल्डरने गिरणीची जमीन घेतली, टॉवर बांधला, त्यात सुर्वेंच्या नावाची साधी लायब्ररीही नाही.त्यांच्या पत्नी कृष्णाबाई सुर्वे यांनी 'मास्तरांची सावली' लिहिले. त्या सावलीत आजही हजारो शिक्षक, कामगार जगत आहेत.

आजच्या तरुणासाठी सुर्वे म्हणजे काय? आजचा तरुण MPSC, UPSC करतो, पण नोकरी मिळाली की पहिला प्रश्न – संपात जाऊ नकोस, बदली होईल. ही भीती सुर्वेंना नव्हती. ते म्हणायचे –

भेटला हरेक रंगात माणूस,पिता, मित्र, कधी नागवणारा होऊन, रटरटत्या उन्हाच्या डांबरी तव्यावर घेतलेत पायाचे तळवे होरपळून!

आजच्या AC ऑफिसमधल्या तरुणाला हा तवा माहितच नाही. म्हणून तो सुर्वे वाचत नाही. शेवटी एकच सांगावेसे वाटते, सुर्वेंच्या शब्दात – आता आलोच आहे जगात, वावरतो आहे ह्या उघड्यानागड्या वास्तवात, जगायलाच हवे, आपलेसे करायलाच हवे, कधी दोन घेत, कधी दोन देत. आज नारायण सुर्वे असते तर त्यांनी पुन्हा फुटपाथवरच कविता लिहिली असती. कारण कविता महालात जन्माला येत नाही, ती घामातून जन्माला येते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्याच कवितेला सलाम – माझे विद्यापीठ मजला शिकवीत आहे, रस्त्यावरल्या शाळेतून.... आणि ही शाळा कधीच बंद होणार नाही, जोपर्यंत एकही माणूस फुटपाथवर झोपला आहे! एका फुटपाथवरच्या कवीला, फुटपाथवरचाच मानाचा मुजरा!

**लेखक**
**अशोक लक्ष्मण कुमावत**
**राष्ट्रपती पुरस्कार विजेते**
**नाशिक**
**९८८१८५६३२७**

## जागतिक रोजगाराच्या संधींसाठी 'जीएसएमएआय'सोबत सामंजस्य करार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेता, महाराष्ट्रातील युवकांच्या कौशल्यांना आंतरराष्ट्रीय संधींची जोड देणे ही काळाची गरज आहे. ग्लोबल स्किल्स मोबिलिटी असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी, परदेशी भाषांचे ज्ञान आणि जागतिक कौशल्य यांच्यात समन्वय साधण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. नवी दिल्लीतील आयटीसी मौर्या येथे जागतिक मनुष्यबळ गतिशीलतेमध्ये भारताची भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी, १७ संस्थापक संस्था, शासकीय प्रतिनिधी, राजनैतिक दूतावास, राज्य सरकारे आणि उद्योगपतींना एकत्र आणणाऱ्या 'ग्लोबल स्किल्स मोबिलिटी असोसिएशन ऑफ इंडिया' (जीएसएमएआय)ची १२ ऑक्टोबर रोजी औपचारिक स्थापना झाली.




## मातीशी नाळ जोडलेल्या जगण्याची हिरवी कहाणी म्हणजे निपेऱ्या – वृक्षमित्र विष्णू वाघ

**दै.आवाज वृत्तसेवा...**

गिरणा गौरव प्रतिष्ठान आयोजित पुस्तकावर बोलू काही या उपक्रमात ३११ वे पुष्प नाशिक येथील हुतात्मा स्मारकात विष्णू वाघ यांनी गुंफले. सिन्नर येथील लेखक वृक्षमित्र विष्णू वाघ यांच्या निपेऱ्या गाडून घेतल्याची गोष्ट या कादंबरीवर ऐस पैस गप्पा करण्यात आल्या, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रपती पुरस्कार विजेते लेखक,अशोक कुमावत सर यांनी केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक,संवेदनशील लेखक,कवी विवेक उगलमुगले हे होते.कार्यक्रमात लेखक वृक्षमित्र विष्णू वाघ यांनी त्यांच्या कादंबरीवर भाष्य करताना कादंबरीची जन्म कहाणी उलगडून सांगितली, निपेऱ्या शब्दाचा अर्थ सांगितला, ते जे कार्य करतात वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाचे त्या वृक्षमित्र फाउंडेशनची संकल्पना व कार्य सांगितले, पेरणी झाली नसली तरी जिद्द कशी अंकुरली हे निपेऱ्या कादंबरीतून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला, ग्रामीण



भागातील लोकसंस्कृती, बोलीभाषा, श्रमसंस्कृती, अंधश्रद्धा, श्रद्धा, निसर्गाशी असलेले नाते, सामाजिक व्यवहार या सर्व गोष्टी कादंबरीतून कशाप्रकारे रेखाटलेल्या आहेत ते त्यांनी सांगितले, बालपणीच्या चुका, खोडकरपणा, अपमान , परवड, गरिबी, अपयश, संघर्ष आणि त्यातून मिळालेले जीवन धडे हे त्यांनी प्रांजळपणे मांडले, निपेऱ्या म्हणजे एका पिढीचा जगण्याचा, संघर्षाचा, संस्काराचा, बदलत्या काळाचा शब्दबद्ध इतिहास आहे, निपेऱ्या म्हणजे मातीशी नाळ जोडलेल्या जगण्याची हिरवी कहाणी आहे, सामान्य मुलाने शिक्षणासाठी केलेली संघर्षाची धडपड आहे. खऱ्या अर्थाने माणुसकीची पेरणी या कादंबरीतून झाली आहे असे मत लेखकाने मांडले. संपूर्ण कादंबरीतून जो संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे तो थोडक्यात लेखकाने पुस्तकावर बोलू काही या आजच्या कार्यक्रमात मांडला.

या भागातील भाग्यवान विजेते म्हणून दत्तू दाणी व सौ.चिंधडेताई यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला, लेखकाचा सत्कार लेखक राजेंद्र देसले यांनी शाल व पुस्तक भेट देऊन करण्यात आला. आजच्या कार्यक्रमात चौथ्या अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा अलका दराडे, स्वागताध्यक्षा सुनंदा पाटील,ज्येष्ठ साहित्यिक तुकाराम ढिकले, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र हिंगणे, अजित कुलकर्णी,कवयित्री जयश्री वाघ, डॉ .चिंधडे,वैशाली वाघ, हाडपे सर, सानिका वाघ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अर्जुन वेलजाळी यांनी केले.




